महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/पदवी-गुणवत्ता यादी २०२०-२१/२०२१/0404 . दिनांक : १३.१०.२०२१

**परिपत्रक:**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील
**पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेप्रकरणी पुनर्विलोकन याचिका...**

संदर्भ : १) प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे पत्र क्रमांक
प्रनिप्रा/प्र.क्र.९०/प्रवेश-२०२०/पु.या./१४९० दिनांक ०१.१०.२०२१.
२) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एडीएम/२०२१/४१९ दि १३.१०.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेप्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाने माहे मे २०२१ ते ऑगस्ट २०२१ या कालावधीत आयोजित केलेल्या बैठकींच्या अनुषंगाने पुढील बाब कळविलेली आहे. त्यानुसार दिनांक ३१.८.२०२१ रोजी बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) नुसार ज्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेप्रकरणी हितसंबंधीत घटकांना पुनर्विलोकन याचिका **(Review Application)** सादर करावयाचे असल्यास संबंधित महाविद्यालयास स्वतंत्ररित्या कळविल्यापासून दोन महिन्याच्या आत आवश्यक माहिती व कागदपत्रांसह सादर करु शकतील. पुनर्विलोकन याचिका प्रक्रिया शुल्क रुपये ५.०००/- धनाकर्षाद्वारे **"The Secretary, Admission Regulating Authority, Mumbai"** (Payable at Mumbai) या नावाने सादर करण्याचे तसेच ही पध्दत पुढील पुनर्विलोकन याचिकेसाठी लागू राहील असे कळविले आहे. (सोबत संदर्भ क्रमांक १ मधील पत्राची प्रत जोडली आहे).

सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी याची नोंद घ्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


**महत्वाचे/ईमेलद्वारे**

क्रमांक : प्रनिप्रा/प्र.क्र.९०/प्रवेश-२०२०/पु.या./ १४९६ दिनांक : 01 OCT 2021

परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.
पुनर्विलोकन याचिका

संदर्भ : मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्देश.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी माहे मे-२०२१ ते ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आलेले आहेत, या संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मध्ये खालील प्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत,-

"झ) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युतर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या माहे मे-२०२१ ते ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये बैठका झालेल्या असून सदरील बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदरील इतिवृत्तांनुसार ज्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी हितसंबंधीत घटकांना पुर्नविलोकन याचिका (Review Application) सादर करण्याचे असल्यास संबंधीत महाविद्यालयास स्वतंत्ररित्या कळविल्यापासून दोन महिन्यांच्या आत आवश्यक माहिती व कागदपत्रांसह सादर करु शकतील, पुर्नविलोकन याचिका प्रक्रिया शुल्क रु. ५,०००/- रक्कमेचा धनाकर्ष 'THE SECRETARY, ADMISSIONS REGULATING AUTHORITY, MUMBAI' (Payble at Mumbai) या नावाने सादर करणे बंधनकारक राहील व हिच पध्दत पुढील पुनर्विलोकन याचिकेसाठी लागू राहील."

प्रस्तूत प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या उक्त निर्णयानुसार आवश्यक कार्यवाही विहित कालावधीमध्ये करवी.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशावरुन.

(चिंतामणी जोशी) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

प्रति,

१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२) संचालक, आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई.
३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
४) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
५) संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६) संचालक/सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे.
७) अधिष्ठाता / प्राचार्य, व्यावसायिक अभ्यासक्रमाशी संबंधित महाविद्यालये.

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-

१) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) सर्व परिक्षा समन्वयक/सहाय्यक परिक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
२) परिक्षा सल्लागार, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
३) प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.
४) मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
५) मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे स्वीय सहाय्यक.
४) प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी.